# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती २०२५-२६

## द्वारा: महात्मा फुले नूतन महाविद्याल मिरजगाव

ता. कर्जत जि. अहिल्यानगर ४१४४०१ इमेल:nagarzone2018@gmail.com

| सचिव | अध्यक्ष |
|---|---|
| **डॉ. राजेंद्रकुमार सुखदेव देवकाते**<br>इमेल :rsdevkate1431@gmail.com<br>मो. नं. ८८३०५४५१४१ ,९६३७१२९५९२ | **प्राचार्य डॉ. तानाजी हनुमंत जाधव**<br>इमेल: thjadhav444@gmail.com<br>मो.नं.९९२११११६५४८ |


**जा.क्र. अजिक्रीवि- १८/ २०२५-२६** **दिनांक:३१/०८/२०२५**

**Only Online Sports Eligibility**

**प्रति,**

**मा. प्राचार्य / मा. संचालक,**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न**

**अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.**

**विषय : अहिल्यानगर जिल्हा आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या online पात्रतेची (Online Sports Eligibility) ची पूर्तता स्पर्धा सुरु होण्या अगोदर करणेबाबत.**

**महोदय,**

सदर विषयानुसार कळविण्यात येते की, अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागीय समितीचे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक नुकतेच जाहीर झाले असून त्यासंबधीचे पत्रक आपणास यापूर्वीच पाठविण्यात आले आहे.

**अहिल्यानगर जिल्हा आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतर तीन विभागाच्या तुलनेत उशिरा म्हणजेच दिनांक ८ सप्टेंबर २०२५ पासून सुरु होत आहेत. त्या अनुषंगाने आपणास जाणीवपूर्वक आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून विभागाचे सर्व कामकाज हे online पद्धतीने होणार असून त्यामध्ये बरीच कामे स्पर्धा स्पर्धा सुरु होण्याच्या अगोदर करावी लागणार आहेत त्यामध्ये, online पद्धतीने लॉटस (भाग्यचक्र) खेळाडूंचे पात्रता फॉर्म पडताळणी, निवड समिती सदस्य, स्पर्धा आयोजक सचिवांनी सादर करावयाची माहिती अशा अनेक बाबींचा समावेश आहे. त्यामुळे सदर स्पर्धेत सहभागी**

होण्यापूर्वी किमान एकदिवस अगोदर Online Sports Eligibility असलेल्या खेळाडूंनाच (संघांना ) क्रीडा स्पर्धेत प्रवेश दिला जाईल.

कोणत्याही परिस्थितीमध्ये पूर्वीची ऑफ लाईन (Offline / Performa ) क्रीडा पात्रता फॉर्म स्वीकारले जाणार नाहीत याची आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांनी व मान्यताप्राप्त संस्थांनी नोंद घ्यावी.

(वरील पत्रक हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्देशनानुसार विभागिय क्रीडा समितीस दिलेल्या अधिकारानुसार असून याची आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांनी व मान्यताप्राप्त संस्थांनी नोंद घेऊन काटेकोरपणे अंमलबजावणी करावी ही विनंती).

तसदीबद्दल क्षमस्व!

धन्यवाद !!

आपले विश्वासू

डॉ. राजेंद्रकुमार सुखदेव देवकाते
सचिव

प्राचार्य डॉ. तानाजी हनुमंत जाधव
अध्यक्ष

अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती